# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १३७/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. रमेश विश्वनाथ सावंत**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का) ए विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग यांचे कार्यालय, ए विभाग म्युनिसिपल कार्यालय,
१३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -०१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता**
बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग यांचे कार्यालय, ए विभाग म्युनिसिपल कार्यालय,
१३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -०१

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०७.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. २८७६/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. ११२५/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १९.११.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना विषय क्रमांक- १ ची उपलब्ध माहिती ३० दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी व असे करते वेळी त्रयस्थ पक्षासंबंधी माहिती व त्रयस्थ पक्ष यांनी सादर केलेली माहिती देण्याअगोदर कलम (११) प्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहिल. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १५.०२.२०२० रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग यांचे कार्यालय, फोर्ट, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. २४.०२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, ए विभाग यांचे कार्यालय, फोर्ट, मुंबई यांच्याकडून दि. १६.०३.२०२० रोजीचा अहवाल आयोगास प्राप्त झालेला आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, राज्य माहिती आयोग बृहन्मुंबई यांचे आदेशानुसार संबंधीताकडे माहिती उपलब्ध करुन देणेविषयी विचारणा करण्यात आली होती व सदर पत्राच्या अनुषंगाने त्रसस्थ पक्ष श्री. राजेश जैन व धीवारचंद जैन यांनी दि. ०३.०१.२०२० अन्वये

..२/-

कळविले की, त्यांची माहिती अपिलार्थी (सध्याचे तक्रारकर्ता) यांना देण्यात येऊ नये. या कारणास्तव त्यांनी दि. ०९.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना कळविले की, त्यांनी विचारलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

8-10-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०८.१०.२०२५**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai